# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## - घोषणा -

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दि. १० एप्रिल, २०१६** रोजी घेण्यात आलेल्या **' राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१६'** या स्पर्धा परीक्षेच्या पेपर क्र. १ व पेपर क्र. २ या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकांच्या चारही संचांची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी **www.mpsc.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर उत्तरतालिकेतील प्रश्न-उत्तरांसंबंधी उमेदवारांना निवेदन करावयाचे असल्यास **परीक्षेचे नाव, प्रश्नसंच आणि पेपर क्रमांकनिहाय** देण्यात यावे. **पेपर क्र. १ व पेपर क्र. २** ची अभिवेनदने **एकाच पाकिटातून परंतू ती स्वतंत्र पानावर** देऊन, अधिप्रमाणित स्पष्टीकरण/संदर्भ यांसह उपसचिव (गोपनीय), महाराष्ट्र लोकसेवा आयोग, ५<sup>१/२</sup>, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ या पत्त्यावर पाठवावीत. या संदर्भात आयोगाकडे दिनांक **२० एप्रिल, २०१६** पर्यंत पोहोचलेल्या निवेदनांचीच फक्त दखल घेण्यात येईल. तद्नंतर आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

(शुभांगी परब)<br>
उपसचिव (गोपनीय)<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग<br>
मुंबई

दिनांक : 13 एप्रिल, 2016<br>
ठिकाण : मुंबई